# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.12.2024** **वारःबुधवार**

---

ठळक बातम्या,

१. लोकसभेत ‘एक देश एक निवडणूक’ संदर्भातील विधेयक सादर,

२. विधान परिषदेच्या सभापतीपदासाठी उद्या निवडणूक,

३. संगीत रसिकांसाठी पर्वणी असलेल्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाला आजपासून पुण्यात सुरुवात,

आणि

४. महिला क्रिकेटमध्ये वेस्ट इंडिजचा भारतावर विजय, तर बॉर्डर गावस्कर करंडकाच्या तिसऱ्या सामन्यात भारतावरील फॉलोऑनची नामुष्की टळली.

लोकसभा

देशात एकाच वेळी निवडणूक घेण्याबाबतची दोन विधेयकं काल लोकसभेत मांडण्यात आली. विधेयक सादर करण्यापूर्वी सभागृहात त्यावर दीड तास चर्चा करण्यात आली. या विधेयकांमुळे राज्यांच्या स्वायत्ततेला बाधा येणार नाही, असा विश्वास कायदे मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी व्यक्त केला. तर काँग्रेसच्या मनीष तिवारी यांनी विधेयक सादर करण्याला विरोध करताना हा संघराज्य रचनेच्या मूलभूत रचनेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न असल्याचं सांगितलं. संघराज्य रचना हे आपल्या लोकशाहीचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे, असं ते म्हणाले. प्रत्येक स्तरावर या विधेयकावर सविस्तर चर्चा करण्याच्या उद्देशानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रारंभीच हे विधेयक संयुक्त संसदीय समितीसमोर मांडण्याचा दृष्टीकोन व्यक्त केला होता, असं केंद्रिय मंत्री अमित शहा यांनी सांगितलं. हे विधेयक या समितीकडे पाठवून त्यांचा अहवाल आल्यावर मंत्रीमंडळ तो स्वीकारेल, असं शहा म्हणाले. सत्ताधारी आघाडीतल्या तेलगू देसम आणि शिवसेनेच्या खासदारांनी विधेयक सादर करण्याला पाठिंबा दर्शवला, तर विरोधी पक्षांच्या काही खासदारांनी त्याला विरोध केला. त्यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी मतदानाची मागणी केली. इलेक्ट्रॉनिक मतदान आणि पेपर स्लिप्सची मोजणी करुन विधेयक सादर करण्याच्या बाजूने 269 मते पडल्यानंतर मंत्री मेघवाल यांनी ‘एक देश एक निवडणूक’संदर्भातील दोन विधेयकं लोकसभेत सादर केली.

राज्यसभा

राज्यसभेत कालही राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवानिमित्त विशेष चर्चा झाली. "भारत ही लोकशाहीची जननी आहे. भारतीय वैचारिक परंपरेनुसार स्वातंत्र्य, समता, समावेशकता आणि स्वीकारार्हता या लोकशाहीत अंतर्भूत असलेल्या मूल्यांमुळे नागरिकांना सन्मानाने जीवन जगता येते," असं सभागृहाचे नेते जे. पी. नड्‌डा या चर्चेत म्हणाले. सरकारचाही हाच दृष्टीकोन असल्याचं त्यांनी सांगितलं. संयुक्त जनता दलाचे नेते रामनाथ ठाकूर, एच. डी. देवेगौडा, केंद्रिय मंत्री भूपेंदर यादव तसंच तृणमूल काँग्रेसच्या नेत्या सुश्मिता देव, द्रमुक खासदार विल्सन, माकपाचे जॉन ब्रिट्टस, आपचे संजय सिंग आणि अन्य खासदार चर्चेत सहभागी झाले होते.

विधी मंडळ कामकाज

महाराष्ट्र मुद्रांक कायदा 1958 मध्ये सुधारणा करणारं विधेयक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत मांडलं. प्रतिज्ञापत्र, करार, तसंच संबधित कागदपत्रांवर लागणारं मुद्रांक शुल्क 100 रुपयांवरून 500 रुपये करण्याची तरतूद यात प्रस्तावित आहे. भागभांडवलावरच्या मुद्रांक शुल्कासाठी भांडवलाची मर्यादा 50 लाखावरून 1 कोटी रुपये करण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे. विधानसभेत काल झाडं तोडण्याबाबतच्या नियमात सुधारणा सुचवणाऱ्या विधेयकावर चर्चा झाली. आमदार शेखर निकम आणि भास्कर जाधव यांनी वृक्षतोडीबाबत लागू असलेल्या कायद्यात वर्गीकरणानुसार दंड आकारला जावा, अशी मागणी केली. विरोधी पक्षनेत्यासंदर्भात कुठलाही प्रस्ताव मिळालेला नाही. तो प्रस्ताव आल्यावर संदर्भ तपासून निर्णय घेऊ, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. विधान परिषदेत काल राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा झाली. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विविध मुद्द्यांवरुन सरकारवर टीका केली. तर भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाचं स्वागत केलं. राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी राज्यसरकार आणखी जोमानं काम करेल, असं ते म्हणाले. महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात उल्लेखनीय कार्य केल्याचं मत शिवसेनेच्या मनीषा कायंदे यांनी व्यक्त केलं. दरम्यान शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मनिषा कायंदे यांची विधान परिषद मुख्य प्रतोदपदी नियुक्ती केली.

तालिका सभाध्यक्ष नियुक्ती

विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी तालिका सभाध्यक्षांची नियुक्ती काल जाहीर केली. विधानसभा तालिका सभाध्यक्षपदी विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम, दिलीप सोपल या आमदारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विधान परिषद सभापती निवडणूक

विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक उद्या होणार असल्याची माहिती उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल दिली. यासाठी आज दुपारी 12 वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे. माजी सभापती रामराजे निंबाळकर यांचा कार्यकाळ संपल्यामुळे सभापतीपद रिक्त आहे.

उद्धव ठाकरे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं. युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार अनिल परब आदी नेते यावेळी उपस्थित होते.
त्याआधी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे यांनी एक देश एक निवडणूक संकल्पनेला विरोध केला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव

भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताची स्वरपंढरी म्हणून ओळखला जाणारा पुण्यातील मानाच्या 70 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. तो 22 डिसेंबरपर्यंत, पाच दिवस चालेल. ऐकूया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून--
शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकारांच्या समृद्ध कलाविष्काराची दीर्घ परंपरा असणाऱ्या आणि पुण्याचे सांस्कृतिक वैभव ठरलेल्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाला यावर्षी 7 दशके पूर्ण होत आहेत. एवढ्या दीर्घकाळात भारतातील शास्त्रीय संगीत क्षेत्राला या स्वरमंचाने अनेक प्रतिभावान दर्जेदार गायक वादक नर्तक कलाकार दिले आहेतच , पण त्याचबरोबर जाणते मर्मन्य संगीतरसिक घडवण्याचेही महत्वपूर्ण कार्य केल आहे ! यावर्षी 15 नविन कलाकार प्रथमच या मंचावर आपली कला सादर करणार आहेत. सर्व महिला कलाकारांचा समावेश असलेला मोहिनी संगीत समूहचा कलाविष्कार, युवा कलाकार अमान आणि अयान अली बंगश यांची सरोद जुगलबंदी, प्रसिद्ध गायक अदनान सामी यांचे शास्त्रीय पियानो वादन,अभिनेत्री शोभना यांचे भरतनाट्यम् नृत्य आणि स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे यांना श्रद्धांजली पर त्यांच्या शिष्यांची सामूहिक स्वरांजली ही यावर्षी च्या सवाईची वैशिष्ट्ये आहेत! पुण्यात सध्या थंडीचा कडाका चांगलाच जाणवत असून या पार्श्वभूमीवर, विविधरंगी शाली आणि स्वेटरच्या पेहरावातील हजारो संगीत रसिकांच्या उपस्थितीत, सवाईच्या मंडपात अस्सल स्वरांची मैफल रंगत जाणार हे निश्चित!
आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, दीपा भंडारे पुणे

राज्यपाल

“प्राप्तीकर अधिकाऱ्यांनी करदात्यांप्रती सहृदयता जपत सक्षमतेने आणि पारदर्शीपणे काम करण्याची गरज आहे”, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते काल नागपूर इथं भारतीय राजस्व सेवेच्या 78 व्या तुकडीच्या प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत

होते. या 78 व्या तुकडीत 145 अधिकारी प्रशिक्षण घेणार असून त्यांच्यात रॉयल भूतान सर्व्हिसच्या 2 अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

मेट्रो

नागपूरमधल्ये मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून 1547 कोटी रुपयांचं अर्थसहाय्य मिळणार आहे. विधानभवनातल्या मंत्रिमंडळ सभागृहात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळेल, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

बंधारा मोहीम

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ तालुक्यात येत्या 21 ते 27 डिसेंबर दरम्यान बंधारे मोहीम आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात बंधारे बांधण्यासाठी अंगणवाड्या, युवक क्रीडा मंडळ, बचतगट, स्वयंसेवी संस्था, विविध कर्मचारी संघटना आणि ग्रामस्थांना सहभागी करुन घेतलं जाणार आहे. गेली सहा वर्ष कुडाळ पंचायत समिती कोणत्याही शासकीय निधीशिवाय केवळ लोकसहभागातून बंधारे मोहीम राबवत आहे.

नई चेतना

धाराशिव जिल्ह्यात केंद्र सरकारच्या ‘नई चेतना’ या अभियानाअंतर्गत ‘लिंगभेद समानता’ या विषयावर जनजागृतीचे कार्यक्रम सुरू आहेत. यामध्ये मुलगा मुलगी एक समान, बालविवाह प्रतिबंध करणे, महिलाविषयक अन्याय अत्याचार हिंसाचार यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि मार्गदर्शन, तसेच हुंडाबंदी, बालविवाह बंदी या सामाजिक विषयावरही जनजागृती केली जात आहे.

जलजीवन मिशन

ग्रामीण भागातील नागरिकांना दरडोई 55 लिटर शुद्ध पिण्याचं पाणी मिळावं, या उद्देशानं राज्य शासनानं जलजीवन मिशन योजना सुरू केली आहे. या अंतर्गत सातारा जिल्ह्यात 1 हजार 100 कामं मंजूर असून ही कामं पुढच्या वर्षाच्या मार्च महिन्यापर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

फिट इंडिया

केंद्र सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं फिट इंडिया उपक्रमाअंतर्गत आयोजित केलेल्या सायक्लोथॉनला काल नाशिकमध्ये सायकलपटूंसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लाभला. सायकलपटूंनी गोल्फ क्लब पासून रॅली काढून नागरिकांना सायकल चालवण्याचं आवाहन केलं.

महिला क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडिजच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान काल नवी मुंबईत झालेला 20 षटकांचा सामना वेस्ट इंडिज संघानं 09 गडी राखून जिंकला. भारतीय संघानं वेस्ट इंडिज संघासमोर विजयासाठी 160 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. स्मृती मानधनानं 41 चेंडूत 62 धावा केल्या.
तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतीय महिला संघानं जिंकला आहे. त्यामुळे मालिकेत आता 1 – 1 अशी बरोबरो झाली आहे. वेस्ट इंडिज महिला क्रिकेट संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये निर्धारित 50 षटकांचे तीन सामनेदेखील खेळले जाणार आहेत.

क्रिकेट

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताच्या पहिल्या डावात आतापर्यंत सर्व गडी बाद 260 धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी काल भारताला फॉलो ऑनची नामुष्की थोडक्यात टाळता आली. काल चौथ्या दिवसाचा खेळ अपुऱ्या प्रकाशामुळे थांबवावा लागला तेव्हा भारताच्या 9 गडी बाद 252 धावा झाल्या होत्या. जसप्रीत बुमराह आणि आकाशदीप यांच्या 39 धावांच्या भागीदारीमुळे भारताला फॉलो ऑन रोखता आला.

हवामान

राज्यात सध्या थंडीचा प्रचंड कडाका जाणवत असून मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. काल सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं 5 पूर्णांक 6 दशांश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.